महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
Website - https://msbsvet.edu.in Email - msbve.secretary@dvet.gov.in दुरध्वनी क्र. ०८६५५९४४८५१/५२/५३/५४

परिपत्रक

पत्र क्र. का.क्र. १२/शैक्षणिक/२०२३/६४४
दिनांक ०२.०६.२०२३

विषय: मंडळांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना Tata Institute of Social Sciences यांच्याव्दारे उच्च शिक्षणास संधी उपलब्ध करुन देणेबाबत...

संदर्भ:

१. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१ (सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९), दि.२०.०१.२०२२
२. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग शासन अधिसूचना क्र.व्हिओसी-२०२०/प्र.क्र.१११/कौशल्य-२, दि.२५.०१.२०२२
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५(अ)/व्यशि-४, दि.२८.०९.२०१२
४. Tata Institute of Social Sciences यांचे पत्र दि.२४.०५.२०२३

१. संदर्भीय अधिनियम क्र. ०१ अन्वये राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाचे नामांतरण करुन "महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ" स्थापन करण्यासाठी व विधीसंस्थापित करण्यासाठी अधिनियम, २०२१ निर्गमित करण्यात आला आहे. सदर अधिनियमाची अंमलबजावणी दि.२६.०१.२०२२ पासून करण्याबाबतची अधिसूचना संदर्भीय क्र.०२ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाने संलग्नता दिलेल्या १२६५ संस्थांमध्ये मंडळाचे काही तासांपासुन, सहा महिने, एक वर्ष व दोन वर्ष कालावधीचे अर्धवेळ व पूर्णवेळ असे ३६५ पदविका (Diploma), प्रगत पदविका (Advance Diploma) व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांत (Certificate Course) प्रशिक्षण देण्यात येत आहे.

३. मंडळाच्या अभ्यासक्रमांची प्रवेश पात्रता ही केवळ साक्षर (प्रमाणपत्र अभ्यासक्रम) पासुन पदव्युत्तर (प्रगत पदविका अभ्यासक्रम) आहे. मंडळाच्या अभ्यासक्रमांचा मुळ उद्देश हा युवक-युवतींना रोजगार व स्वयंरोजगारक्षम बनविणे आहे. तथापि, मंडळाच्या अभ्यासक्रमांत प्रशिक्षण पूर्ण करण्याऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधीदेखिल उपलब्ध करुन देण्याकरिता संदर्भीय शासन निर्णय क्र.०५ अन्वये मंडळाचे दोन वर्षे

कालावधीच्या अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणाच्या +२ स्तराची समकक्षता (Equivalence) निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

४. Tata Institute of Social Sciences यांचे संदर्भीय पत्र क्र.०४ अन्वये त्यांनी प्रपत्र अ मध्ये नमुद मंडळाचे दोन वर्षे कालावधीच्या २३ पदवीका (Diploma) अभ्यासक्रमात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय पदवी (Bachelor of Vocation) अभ्यासक्रमांत प्रवेशाकरिता पात्र केले आहे.

५. सन १९३६ मध्ये Sir Dorabji Tata Graduate School of Social Work म्हणून स्थापित झालेल्या संस्थेचे नामांतर सन १९४४ मध्ये Tata Institute of Social Sciences असे करण्यात आले. Tata Institute of Social Sciences या संस्थेस विद्यापीठ अनुदान आयोग कायदा (UGC) १९५६ च्या कलम ३ अंतर्गत भारत सरकारच्या अनुदानित Multi Campus Deemed University म्हणून मान्यता मिळाली आहे.

६. Tata Institute of Social Sciences यांच्या व्यवसाय पदवी (Bachelor of Vocation) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. मंडळाच्या संकेतस्थळाव्दारे Tata Institute of Social Sciences यांच्या व्यवसाय पदवी (Bachelor of Vocation) अभ्यासक्रमास प्रवेशासाठी अर्ज करण्याची Link उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

YOGESH SURESH PATIL
Digitally signed by YOGESH SURESH PATIL
Date: 2023.06.02 12:20:34 +05'30'

(योगेश सुरेश पाटील)
संचालक

**प्रत: माहितीसाठी**

१. मा.प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई ३२
२. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

**प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (सर्व)
३. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त व इच्छुक संस्था
४. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)

**Annexure A : Mapping of Board courses with B.Voc courses**

| S.N. | Board Course | Sectors Mapped | TISS B.Voc Course |
|---|---|---|---|
| 1 | Diploma Course in Computer Science | ITES | B.Voc in Software Development |
| 2 | Diploma Course in Computer Information Technology | ITES | B.Voc in Software Development |
| 3 | Diploma Course in Computer Animation | Media and Entertainment | B.Voc in Graphics and Multimedia |
| 4 | Diploma Course in Visual Design and Arts | Media and Entertainment | B.Voc in Graphics and Multimedia |
| 5 | Diploma Course in Medical Lab Technician | Healthcare | B.Voc in Medial Laboratory Technology and all other B.Voc programs from Healthcare Sector |
| 6 | Diploma Course in Physiotherapist (For Blind) | Healthcare | All B.Voc programs from Healthcare Sector |
| 7 | Diploma Course in Physiotherapist | Healthcare | All B.Voc programs from Healthcare Sector |
| 8 | Diploma Course in Dietician and Nutrition Science | Healthcare | All B.Voc programs from Healthcare Sector |
| 9 | Diploma Course in Panchakarma Therapy | Healthcare | All B.Voc programs from Healthcare Sector |
| 10 | Diploma Course in Dialysis Technology | Healthcare | B.Voc in Dialysis Technology and all other B.Voc programs from Healthcare Sector |
| 11 | Diploma Course in Basic Refrigeration and Air Conditioning | Electronics | B.Voc in Refrigeration and Air Conditioning |
| 12 | Diploma Course in Mechanical Engineering | Capital Goods | B.Voc in Mechatronics Technology |
| 13 | Diploma Course in Agricultural Technology | Agriculture | B.Voc in Agriculture |
| 14 | Diploma Course in Dairy Farming | Agriculture | B.Voc in Agriculture |
| 15 | Diploma Course in Agriculture Engineering | Agriculture | B.Voc in Agriculture |
| 16 | Diploma Course in Auto Engineering Technician | Agriculture | B.Voc in Automotive Servicing Technology |
| 17 | Diploma Course in Mechanic Motor Vehicle | Agriculture | B.Voc in Automotive Servicing Technology |
| 18 | Diploma Course in Hotel Operations | Hospitality | B.Voc in Hotel Management |
| 19 | Diploma Course in Physical Education | Sports | B.Voc in Sports Management |
| 20 | Diploma Course in Professional Beautician | Beauty and Wellness | B.Voc in Cosmetology and Aesthetics |
| 21 | Diploma Course in Travel and Tourism Management | Tourism and Hospitality | B.Voc in Travel and Tourism |
| 22 | Diploma Course in Basic of Tourism and Aviation Industry Management | Tourism and Hospitality | B.Voc in Travel and Tourism |
| 23 | Diploma Course in Hospitality Management | Hospitality | B.Voc in Hospitality Management |